MHDH060009352025

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३३६/२०२५**

**राकेश अर्जुन भोई व इतर**
**वि.**
**कोणीही नाही**

**निशाणी क्रमांक १ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन VIII चे कलम २ व ३ प्रमाणे वारसा दाखला मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्ज व अर्जदारांनी अभिलेखावर सादर केलेल्या पुराव्याचे अवलोकन केले. अर्जदार यांचे तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. व्ही. एल. पाटील यांचा युक्तिवाद ऐकला.

**अर्जदार यांचे कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे :-**

३. अर्जदार हे मुळचे मौजे शिंदखेडा, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदार क्र. १ यांचे वडील व अर्जदार क्र. २ यांचे पती नामे कै. अर्जुन गंगाराम भोई हे दिनांक १५/०७/२०२२ रोजी मौजे शिंदखेडा, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. मयताचे आई-वडील हे यापूर्वीच वृध्दापकाळाने मयत झालेले आहेत. मयत कै. अर्जुन गंगाराम भोई यांचे मृत्युनंतर अर्जदार यांना शासकीय कामासाठी वारस दाखल्याची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

४. अर्जदारांच्या मागणी प्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्यासंदर्भात इतर कोणाच्या काही हरकती असतील, तर त्या मागवण्याकरीता ''दैनिक पथदर्शी'', या वृत्तपत्रात दिनांक १४/१०/२०२५ रोजी जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. सदर वृत्तपत्राची प्रत नि.क्र. १४ कडे दाखल आहे. परंतु, प्रस्तुत कामी अर्जदारांच्या अर्जास कोणीही इसमाने हजर होऊन हरकत घेतलेली नाही.

५. अर्जदारांनी अर्जातील कथनांच्या पुष्ट्यर्थ नि.क्र. १० वर अर्जदार क्र. १ यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी अर्जातील कथनांचा

पुनरुच्चार केलेला आहे. उपरोक्त तोंडी पुराव्या व्यतिरिक्त अर्जदारांनी कागदोपत्री पुरावा देखील सादर केलेला आहे. अर्जदारांनी नि.क्र. ११ कडे हजर केलेल्या मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन करीता असे दिसून येते की, मयत अर्जुन गंगाराम भोई हे दिनांक १५/०७/२०२२ रोजी मौजे शिंदखेडा, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. तसेच नि.क्र. १२ व १३ कडे अर्जदार यांच्या आधार कार्डच्या पडताळीत प्रती दाखल केलेल्या आहेत. उपरोक्त कागदोपत्री पुरावा हा अर्जदार यांच्या तोंडी पुराव्यास पुष्टी देणारा आहे. उपरोक्त तोंडी पुरावा नि.क्र. १५ अन्वये बंद केला आहे.

६. अर्जदारांच्या अर्जातील कथनांना व त्यातील त्यांच्या मागणीला कोणीही हरकत घेतलेली नाही. तसेच, त्यांनी सादर केलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा हा विनाआव्हानित राहीलेला आहे. त्यामुळे त्यांच्यावरती विश्वास ठेवणे रास्त होईल असे माझे मत आहे. वरील तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरुन असे दिसून येते की, मयत अर्जुन गंगाराम भोई हे मौजे शिंदखेडा, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथील कायम रहिवाशी असून ते दिनांक १५/०७/२०२२ रोजी मौजे शिंदखेडा, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथे मयत झालेले आहेत. नि.क्र.१२ व १३ वर अर्जदारांनी त्यांच्या आधार कार्डाच्या पडताळीत प्रती दाखल केल्या आहेत. वरील पुराव्यावरुन असेही स्पष्ट होते की, मयत अर्जुन गंगाराम भोई यांचा अर्जदार क्र. १ हा मुलगा असून अर्जदार क्र. २ ही पत्नी या नात्याने हिंदू वारसा कायद्याप्रमाणे त्यांना कायदेशीर वारस आहे. त्याकारणे, मयत अर्जुन गंगाराम भोई यांचे पश्चात अर्जदार हे हिंदू वारसा कायद्याप्रमाणे त्यांना कायदेशीर वारस आहेत असा निष्कर्ष निघतो. सबब, बॉम्बे रेगुलेशन VIII चे कलम २ व ३ प्रमाणे, अर्जदार हे मयत अर्जुन गंगाराम भोई यांचे कायदेशीर वारस असल्याचा दाखला मिळण्यास पात्र ठरतात. म्हणून, मी वरील चर्चीत कारणांकरिता पुढील आदेश पारित करीत आहे :-

**-: आदेश :-**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १) राकेश अर्जुन भोई व अर्जदार क्र. २) मंगलबाई अर्जुन भोई हे मयत कै. अर्जुन गंगाराम भोई यांचे कायदेशीर वारस आहेत असे जाहीर करण्यात येते.

३. त्याप्रमाणे अर्जदार यांना योग्य तो मुद्रांक शुल्क भरून घेऊन वारस दाखला देण्यात यावा.

HARSHADA SURESH ADMANE

Digitally signed by HARSHADA SURESH ADMANE
Date: 2026.03.09 17:50:03 +0530

दिनांकः ०९/०३/२०२६.

(हर्षदा सु. आदमाने)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
शिंदखेडा, ता. शिंदखेडा जि. धुळे

–: प्रमाणपत्र :–

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईलमधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नाव :– राहुल नवल माळी,
न्यायालयाचे नाव :– दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर,
शिंदखेडा, जि. धुळे.

आदेश अपलोड केलेचा दिनांक :– ०९/०३/२०२६.

लघुलेखक, श्रेणी–३,
दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिंदखेडा